महाराष्ट्र शासन
अधीक्षक अभियंता व सहसंचालक
**महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी**
जलसंपदा विभाग, दिंडोरी मार्ग, नाशिक-४२२ ००४
प्रशिक्षण शाखा फोन: नं. (०२५३) २५३१६९५ E Mail ID : semetatraining@gmail.com

ई-मेलद्वारे

जा.क्र./मअप्रप्र/प्रशिक्षण/नस्ती क्र.२५-२०२४/वलि/ ३४६/सन-२०२५

दिनांक- ०७/०५/२०२५

प्रति,
अधीक्षक अभियंता तथा जिल्हा नोडल अधिकारी (सर्व)
जलसंपदा विभाग.

विषय:- राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी जलसंपदा विभागांतर्गत आंतरवासिता उपक्रम राबविणे.

| मृद चाचणी विभाग<br>म.अ.सं.सं. नाशिक-४२२.००४ | |
|---|---|
| वैज्ञा. संशोधन अधिकारी | |
| सहा. संशोधन अधिकारी/ | |
| वैज्ञानिक अधिकारी | |
| वरिष्ठ लिपिक | |
| आवक क्रमांक | |
| दिनांक: | |

संदर्भ :-
१) जलसंपदा विभाग, कार्यालयीन आदेश क्रमांक: टिजीओ- २०२४/(प्र.क्र.३४/२०२४) आ.प्रशि, दि.१५/०१/२०२५.
२) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मअप्रप्र/प्रशिक्षण/नस्ती क्र.२५-२०२४/वलि/१००/ सन २०२५, दि.१४/०२/२०२५.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र.१ अन्वये महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभागामध्ये राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आंतरवासिता उपक्रम राबविणेकरिता आपली जिल्हा नोडल अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे. सदर उपक्रम सक्षमपणे व प्रभावीपणे राबविणेकरिता आपले मंडळ तसेच जलसंपदा विभागांतर्गत कार्यरत असलेले जिल्ह्यातील दुसरे मंडळ व त्यांचे अधिनस्त कार्यालय यांची AICTE पोर्टलवर नोंदणी विहीत मुदतीत झाल्याची खातरजमा करुन घ्यावी व त्यापुढील कार्यवाहीसाठी सर्व कार्यालयांना प्रेरित करावे. आंतरवासिता उपक्रमाकरिता मा.महासंचालक, मेरी, नाशिक यांचे मार्गदर्शनाखाली आंतरवासिता उपक्रमासाठी काम करावयाचे असुन, आपापल्या जिल्ह्यातील आंतरवासिता उपक्रमाची माहिती AICTE पोर्टलवर अपलोड करणे तसेच संबंधित जिल्ह्यातील आंतरवासिता उपक्रमाच्या अनुषंगाने सर्व बाबींचे समन्वय करणे अपेक्षित आहे.

त्याचप्रमाणे आंतरवासिता उपक्रम राबविणेसाठी खालील मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करावा.

१) संदर्भिय पत्र क्र.१ च्या शासन निर्णयातील अटी व शर्ती यांचा अवलंब करावा.
२) आंतरवासिता उपक्रमासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या (AICTE) (internship.aicte-india.org) या पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करण्याकरिता दिलेल्या यादीतील अग्रशब्द (prefix) चा वापर करावा.
३) पहिल्या टप्प्यात आंतरवासितासाठी ६ विद्यार्थ्यांची निवड करावी. निवड करावयाच्या एकूण विद्यार्थ्यांपैकी ५० टक्के जागा महिला विद्यार्थ्यांसाठी असतील. तथापि पात्र महिला विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास त्या जागांवर पुरुष विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल.



Scanned with OKEN Scanner

4) Step 6 : Enter Organisation name आणि Step 7 : Enter Organisation name as first name येथे organisation name च्या सुरुवातीला दिलेल्या यादीतील prefix without space लिहावे. उदा. आपल्या कार्यालयाचे नांव Command Area Development Authority, Ahilyanagar असे असेल तर दिलेल्या यादीतील prefix वापरुन MHWRD01Command Area Development Authority, Ahilyanagar असे लिहावे.

(प्र.मा.बावीस्कर)
अधीक्षक अभियंता व सहसंचालक
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी
नाशिक

सहपत्र:- १. संदर्भ पत्र क्र.१ ची छायांकीत प्रत
२. नोडल अधिकारी यांची यादी

प्रत:- मा.महासंचालक, सं.प्र.ज.सं.सु (मेरी), नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत:- मा. मुख्य अभियंता, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत:- अधीक्षक अभियंता तथा उपसचिव (मो.प्र. २), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत:- मास्टर फाईल-२०२५

Scanned with OKEN Scanner